## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑगस्ट २०१८.

## अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी. १६१७/प्र.क्र.२३४/का. बारा.—महाराष्ट्र राज्याला लागू असल्याप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) चे कलम ७ सह वाचनीय कलम ९ ने बहाल केलेल्या आणि शासनाला या बाबतीत असलेल्या सर्व सहाय्यभूत अधिकारांचा वापर करून आणि बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदुरा या महसुली तालुक्यांबाबत या संदर्भात जारी केलेल्या पूर्वीच्या अधिसूचनांमध्ये अंशतः सुधारणा करून आणि मुंबई उच्च न्यायालयासोबत सल्लामसलत/विचारविनिमय केल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे निर्देशित करते की, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/१२, दिनांक २५ नोव्हेंबर, २००९ अन्वये बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदुरा या महसुली तालुक्यांकरिता निर्मित सत्र विभाग आणि मलकापूर येथील सदर सत्र विभागाच्या स्थळ सीमेत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांच्या संपरीक्षेकरिता मलकापूर येथे स्थापित व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बुलढाणा पिठासीन अधिकारी असलेले जोड सत्र न्यायालय शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/१२, दिनांक २५ नोव्हेंबर, २००९ आणि क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/१२, दिनांक २१ मार्च २०१२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दिनांक १६ ऑगस्ट २०१८ पासून बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदूरा या महसुली तालुक्यांकरिता सत्र विभाग आणि मलकापूर येथील एक सत्र न्यायालय असेल आणि सदर सत्र विभागाच्या स्थळ सीमेत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांच्या संपरीक्षेकरिता अतिरिक्त सत्र न्यायाधीश हे सदर न्यायालयाचे पिठासीन अधिकारी असतील. प्रमुख सत्र न्यायाधीश, बुलढाणा हे मलकापूर सत्र विभागाकरितासुद्धा सत्र न्यायाधीश असतील आणि सदर सत्र विभागातील प्रकरणांमधून त्यांना योग्य वाटतील अशी प्रकरणे स्वतः कडे काढून घेण्याचे किंवा सक्षम अधिकारितेच्या अन्य कोणत्याही न्यायालयाकडे वर्ग करण्याचे किंवा मलकापूर येथील सहायक अथवा अतिरिक्त सत्र न्यायाधिशांकडे वर्ग करण्याचे अधिकार त्यांना राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. श्या. कलोती,**

शासनाचे सहसचिव.